# तुफान

ना. सी. फडके

रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**तुफान : ना. सी. फडके**

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
riyapublications@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
जयंत प्रिंटरी

**आवृत्ती**
२२ ऑक्टोबर, २०१३

**किंमत**
₹ २५०/-

# तुफान

# आकाशाची कुऱ्हाड !

वाद्य-संगीताची मोठी ललकारी झाली. रेडिओवरचं नाटक समाप्त झालं. क्षणभर स्तब्धता झाली.

हॉलमध्ये दाटीनं बसलेल्या माणसांनी भिंतीवरच्या मोठ्या घड्याळाकडे सहज बघितलं. रात्रीचे अकरा वाजायला एक मिनीट कमी होतं.

दुसऱ्याच क्षणी रेडिओतून पुन्हा आवाज ऐकू येऊ लागला. सर्व मंडळींचं लक्ष त्या आवाजाकडे वळलं. सर्वांच्या चेहऱ्यावर परमावधीची उत्कंठा दिसू लागली. जी बातमी ऐकावयास मिळते काय म्हणून त्या छोट्या शहरातले लोक त्या हॉलमध्ये जमा झाले होते, ती बातमी आता तरी कानी पडेल अशा आशेनं त्या सर्वांच्या मुद्रा चमकू लागल्या...

नेताजींच्या आझाद हिंद फौजांनी टिड्डम, टामू, पलेल अशा मार्गानं एकेक ठाण सर करीत, विजय मिळवीत, शत्रुसैन्याला मागं रेटीत भरारी मारल्याच्या बातम्या त्यांनी ऐकल्या. त्याला किती तरी दिवस झाले होते. ब्रह्मदेशाची वायव्येकडची सरहद्द ओलांडून आझाद हिंद फौज केव्हाच पलीकडे गेल्या होत्या. भारताच्या भूमीवर तिरंगी झेंडा जागोजाग फडकू लागला होता. कोहिमा केव्हाच पडलं होतं. त्या ठिकाणी आझाद हिंद सैन्याचा तळ पडला होता. आपल्या स्वतंत्र सरकारच्या कचेऱ्या घेऊन नेताजी त्या ठिकाणी पोचले होते. मणिपूर संस्थानची राजधानी इंफाळ आझाद हिंद फौजेच्या वेढ्यात सापडली होती. इंफाळ-कोहिमा-दिमापूरचा त्रिकोण सर्वस्वी आझाद हिंद सैन्याच्या ताब्यात आला होता. भारताचा आसाम प्रांत नजरेच्या टप्प्यात

होता. 'वंदे मातरम्'चं गीत रचिणाऱ्या बंकिमचंद्रजी जन्मभूमी बंगाल दूर नव्हता. आणि मग दिल्लीच्या ज्या लाल किल्ल्यावर तिरंगी निशाण रोवण्याची नेताजींची प्रतिज्ञा होती तो किल्लाही दूर नव्हता. इंफाळच्या वेढ्यात सापडलेलं ब्रिटिशांचं सैन्य शरण आलं की आझाद हिंद फौजेची दिल्लीपर्यंतची वाट खुली होणार होती. आणि इंफाळ आझाद हिंद सैन्याच्या हातात पडल्यावाचून रहात नाही अशा बातम्या गेले दोन दिवस सारख्या येत होत्या...

''कोणत्याही क्षणाला इंफाळ पडेल, विजयोत्सवाची तयारी ठेवा.'' असा आघाडीवरचा संदेश रविवार ता. ८ जून १९४४ च्या सकाळपासून पुन्हा पुन्हा आला होता. सिंगापूर, बँकॉक यासारख्या दूर पूर्वेकडल्या शहराप्रमाणेच ब्रह्मदेशातल्या रंगून, प्रोम, मंडालेसारख्या शहरातही आघाडीवरचा हा संदेश ऐकल्यापासून लोकांच्या उत्साहाला भरती आली होती. मंडालेच्या दक्षिणेस पासष्ट मैलावर असलेलं, एक सुंदर सरोवराच्या काठावर वसलेलं मिक्टिला हे आकारानं एवढंस शहर! इथे हिंदी लोकांची वस्तीदेखील थोडीच, बहुतेक वस्ती ब्रह्मी लोकांची, आणि थोडीशी मुसलमान नवरा आणि ब्रह्मी बायको अशा लग्नापासून झालेल्या व 'झेरबादी' अशा नावानं ओळखल्या जाणाऱ्या प्रजेची, परंतु या छोट्याशा शहरातदेखील 'इंफाळ पडणार! विजयोत्सवाची तयारी ठेवा' असा आघाडीवरचा संदेश आलेला असल्याची बातमी सकाळी रेडिओवर ऐकल्यापासून लोकांचा उत्साह ओसांडून वाहू लागला होता. इंफाळच्या शरणागतीची वार्ता आल्याबरोबर आनंदोत्सव कशा प्रकारे साजरा करावयाचा ते ठरविण्यासाठी गावातले प्रमुख लोक एकत्र जमले होते. रस्ते कसे शृंगारावयाचे, जाहीर सभा कोणत्या ठिकाणी भरवायाची, इत्यादी कार्यक्रमाची चर्चा त्यांनी केली होती.

मिक्टिला म्हणजे रामायणकालातील मिथिला नगरीच या सिद्धांताबद्दल संशोधकात, पंडितात एकवाक्यता नसेल, परंतु शहरातलं श्रीरामचंद्राचं मंदिर म्हणजे भाविक हिंदू रहिवाशांच्या आदराचं आणि भक्तीचं मुख्य स्थान, याबद्दल दुमत नव्हतं. वानरसेनेच्या साहाय्यानं लंकेवर स्वारी करून रावणाच्या बंदीतून सीतामाईला सोडविणारे व रावणाचा नाश करणारे प्रभू रामचंद्र, आणि आझाद हिंद सैन्याच्या मदतीनं दिल्लीच्या रोखानं निघालेले व ब्रिटिशांच्या गुलामगिरीत पडलेल्या भारताची मुक्तता करणारे नेताजी, या दोघांची तुलना हिंदू लोकांच्या मनात साहजिकच येणारी



होती. मिक्टिलाच्या राममंदिरातल्या गाभाऱ्यापुढे सदैव बसणाऱ्या एका साधूनं तर या तुलनेचं एक छोटंसं हिदी काव्य रचलं होतं, आणि ते अनेकांच्या तोंडी झालं होतं. मिक्टिलातली लहानमोठी मुलं या साधूकडे हवं तेव्हा जात आणि म्हणत ''बाबा, आम्हाला तुमचं ते गीत ऐकवा.'' बाबा त्यांना म्हणत, ''मी एकेक कडवं सांगतो. तुम्ही म्हणा.'' मग त्या गीताचं गायन मंदिराच्या सभामंडपात खुल्या आवाजात सुरू होई, आणि दर्शनाकरता येणाऱ्या स्त्री-पुरुषाचा घोळका त्याच्याभोवती जमा होई. व्रतवैकल्याच्या दिवशी, सणाच्या दिवशी उत्सवप्रियतेची हौस पुरी करून घेण्यासाठी मिक्टिला शहरातील हिंदूंचीच नव्हे तर इतर रहिवाशांचीदेखील दृष्टी या राम मंदिराकडेच वळत असे. नेताजींच्या फौजांनी इंफाळ सर केल्याची बातमी आल्याबरोबर विजयोत्सव कसा साजरा करावयाचा, याचा विचार मिक्टिलाचे प्रमुख नागरिक करू लागले. तेव्हा सर्वांना प्रथम आठवण झाली ती साहजिकपणेच या राममंदिराची. मंदिराचा कळस विजेच्या दिव्यांनी मढवून काढण्याची कल्पना निघाली, गोर-गरिबांना अन्न वाटायचं ठरलं. मंदिरापुढचं पटांगण सुशोभित करून जाहीर सभादेखील तिथेच घेण्याचा बेत ठरला. या उत्सवाच्या तयारीमागचा आनंद केवळ हिंदी माणसांपुरता मर्यादित नव्हता, ज्या बातमीची अपेक्षा होती तिनं मिक्टिलातली ब्रह्मी जनतादेखील आनंदित झाली होती.

ब्रह्मदेशातल्या तमाम ब्रह्मी लोकांची या काळातली विचारसरणी काहीशी गुंतागुंतीची होती. १९४२ च्या सुरुवातीस जपानी फौजा ब्रह्मदेशांत शिरल्या. ब्रिटिश राज्यकर्ते पळाले, हळूहळू सत्तांतर होऊन अखेर ब्रह्मी सरकार अस्तित्वात आलं. आँग सानसारख्या ब्रह्मी देशभक्तांचं ब्रह्मी स्वातंत्र्यांचं स्वप्न थोडंफार साकार झालं. इत्यादी घटनांचा हर्ष ब्रह्मी जनतेला व्हायचा तो झालाच होता. परंतु जसजसे दिवस जाऊ लागले तसतशी त्यांची जपानी लोकांविषयीची कृतज्ञता ओसरू लागली होती. जपानी आले म्हणून जुने ब्रिटिश राज्यकर्ते पळाले, याची जाणीव शिळी होऊ लागली होती. जपानी सत्ता आली म्हणून जुनी जुलमी ब्रिटिश सत्ता उखडली गेली, परंतु तिनं ब्रह्मी जनतेला किती स्वातंत्र्य आणि सुबत्ता दिली, असा प्रश्न लोकांच्या मनात डोकावू लागला होता. जपानी आपल्या देशात येऊन बसले ते काही केवळ परोपकार बुद्धीने नव्हे तर केवळ स्वार्थासाठीच येऊन बसले आहेत, याचा उमज लोकांना अधिकाधिक पडू लागला होता. आपल्या देशाला मिळालेलं स्वातंत्र्य

जोपर्यंत जपानच्या छत्राखालचं आहे तोपर्यंत ते काही खरं स्वातंत्र्य नाही, देशात आहेत, हे काही बरं नव्हे, ब्रिटिश जसे गेले तसेच हे जपानी लोकही आपल्या देशातून गेल्याखेरीज आपल्या देशाचा कारभार पूर्णत्वानं आपल्या हातात येणार नाही, हा विचार लोकांच्या मनात बळावू लागला होता. जपानी सैनिकांनी केलेल्या अत्याचारांच्या आणि जपानी अधिकाऱ्यांनी केलेल्या जोर -जुलमाच्या जखमा किती तरी माणसांच्या मनात कमी-अधिक ताज्या होत्या... अशा अनेक कारणांमुळे जपानविषयीचं प्रेम, सहानुभूती, कृतज्ञता इत्यादी भावनांना एकंदर ब्रह्मी जनतेच्या अंत:करणात आता फार थोडं स्थान राहिलं होतं. १९४४ च्या जून महिन्याच्या सुमारास ब्रह्मी लोकांना जपानी लोक नकोसेच होते.

युद्धाची धडक मणिपूर संस्थानच्या राजधानीपर्यंत पोचली याबद्दल ब्रह्मी लोकांना हर्ष वाटला होता तो जपानची सरशी होत आहे या विचारांनी नव्हे; तर भारताच्या स्वातंत्र्यासाठी दिव्य करावयास निघालेल्या नेताजींना यश मिळत आहे या विचारानं. गुलामगिरीची दु:खं हिंदी लोकांप्रमाणेच ब्रह्मी लोकांनी अनुभविली होती. त्या दु:खातून मुक्त होऊ पहाणाऱ्या ब्रह्मी जनतेला भारताच्या मुक्ततेविषयी जिव्हाळा वाटत होता. भारत स्वतंत्र व्हावा असं त्यांनाही वाटत होतं. नेताजींचे प्रयत्न यशस्वी होऊन ब्रह्मदेशाच्याही अगोदर भारत पूर्णत्वानं स्वतंत्र झालेला त्यांना दिसला तर त्यात त्यांना मोठा आनंद वाटणार होता. टिड्डिमा, टामू, पलेल, कोहिमा अशी महत्त्वाची ठाणी एकामागोमाग एक हाती आल्याची वार्ता थोड्या थोड्याच दिवसांच्या अंतरानं येत गेली तेव्हा जपानची लष्करी मदत नेताजींना आहे म्हणून हे घडत आहे हे माहीत असूनही ब्रह्मी लोकांना कौतुक वाटलं ते जपानचं नव्हे तर नेताजींच्या फौजेतील जवानांचं. जपानविषयीचं कौतुक आणि प्रेम ब्रह्मी लोकांच्या मनात फारसं उरलं नव्हतं; परंतु नेताजींच्या फौजेचे पराक्रम त्यांना कौतुकाचे वाटत होते... इंफाळ पडलं की नेताजीना केवढा विजय मिळणार होता आणि या विजयामुळे नेताजींची 'चलो दिल्ली'ची घोषणा कशी प्रत्यक्षात उतरणार होती. त्याची ब्रह्मी लोकांना पूर्ण कल्पना होती... इंफाळ पडणार, हे ऐकल्यावर सिंगापूर-बँकॉक प्रमाणेच ब्रह्मदेशातल्या साऱ्या छोट्या मोठ्या शहरात केवळ हिंदी लोकांनाच नव्हे; तर बहुसंख्य ब्रह्मी लोकांनादेखील मनस्वी आनंद झाला. जे इतर शहरी घडलं तेच छोट्या निसर्गरम्य मिक्टिला शहरातही घडलं... रविवार ता. १८ रोजी सकाळपासून रात्रीपर्यंत मिक्टिला



शहराच्या रस्त्या-रस्त्यात, चौका-चौकात, दुकाना-दुकानात, देवळात, मशिदीत, पॅगोडात, जिथे तिथे लोक एकमेकाला विचारीत होते, ''इंफाळ पडल्याची बातमी आली काय?'' आणि सांगत होते, ''येईल! आत्ता येईल.''...

विजयाची बातमी ऐकण्यासाठी सारे लोक इतके आतुर झाले होते की, जिथे जिथे रेडिओ होते त्या त्या घरापुढे लोकांचे लहानमोठे थवे दिवसभर रेंगाळले होते, ओळखीची माणसं घरात शिरून घटकान् घटका बसून राहिली होती. जेवण्या-खाण्यासाठी गेली तरी पुन्हा येऊन बसली होती. रात्र झाली तरी हालली नव्हती. इंफाळच्या बातमीची तहान साऱ्यांना लागली होती. रात्री तरी हवी ती बातमी रेडिओवर ऐकायला मिळेल अशा आशेनं मिक्टिला शहरातल्या कित्येक घरात माणसं रेडिओपुढे बसून राहिली होती. घरमालकांनी ओळखीचा बिनओळखीचा असा भेद केला नव्हता. जो जो बातमी ऐकायला आला होता त्याला खुशाल घरात बसू दिलं होतं. कॉफी देऊन आगतस्वागतदेखील केलं होतं.

मोटार वाहतुकीचा धंदा करून गेल्या पंचवीस तीस वर्षांपासून मिक्टिलात स्थायिक झालेल्या बहादरसिंगाचं घर म्हणजे एका बड्या नागरिकांचं बडं घर, तेव्हा त्या घराच्या मोठ्या दिवाणखान्यात रेडिओवरची बातमी ऐकण्यासाठी आलेल्या माणसांची गर्दी सगळ्यात अधिक असावी हे साहजिकच होतं. चांगली शे-पाऊणशे माणसं जमली होती, आणि येवढा मोठा हॉल परंतु तो अपुरा वाटू लागला होता. दुकानदार, सावकार, व्यापारी, रोजगारवाले अशी माणसंच नव्हे, तर रिकामटेकडे लोकदेखील जमा झाले होते. बहादरसिंगांच्या परिचयातल्या लोकांप्रमाणेच ज्यांचा त्यांच्याशी मुळीच परिचय नव्हता असे लोकदेखील खुशाल येऊन बसले होते. ज्यांनी आजपर्यंत मिक्टिला शहरातला देखणा आणि शोभिवंत बंगला केवळ दुरूनच बघितला होता, आणि ज्यांना एरवी फाटकावरच्या दरवानानं हटकलं असतं असे शहरातले बेकार उनाड टोळभैरवसुद्धा हॉलमध्ये येऊन बसले होते. हा प्रसंगच इतक्या आनंदाचा होता की, का आलांत, कशाला आलांत असे कुणी कुणाला विचारण्याचा संभव नव्हता. इंफाळच्या पाडावाची बातमी ज्याला ज्याला ऐकायची असेल त्याला त्याला बहादरसिंगांचं घर आज खुलं होतं. बातमी ऐकण्याची उत्सुकता येवढा एकच परवाना आज कुणालाही पुरेसा होता.

ज्यांनी या घरात पाऊल टाकण्याचं धाडस एरवी केलं नसतं अशा माणसांना आज प्रवेश मिळाला होता खरा, पण ही माणसं हॉलमध्ये बसली होती ती संकोचानंच,

कशाला आलात, उठा, जा इथून, असं आपल्याला कुणी म्हणतंय की काय अशी शंका मनात लपविल्याप्रमाणे त्यांचे चेहरे उघड उघड दिसत होते, आणि ज्या घरातल्या श्रीमंती थाटामाटाबद्दल आजपर्यंत नुसतं सांगोवांगी ऐकलं त्या घरात आज आलोच तर सारं बघून घेऊ या अशी उत्सुकताही त्यांच्या नजरेत दिसत होती. बहादरसिंगच्या मोटार कारखान्यातल्या नोकराकडून त्यांनी ऐकलं होतं की बहादरसिंगांचा बंगला आतून फार शृंगारलेला आहे. दालना दालनात किमती फर्निचर, गालीचे रूजामे, आरसे आहेत. मधला मोठा दिवाणखाना तर फारच शोभिवंत आहे. या दिवाणखान्याचं जे वर्णन त्यांनी ऐकलं होतं ते त्यांना आता प्रत्यक्षच दिसत होतं. सबंध दिवाणखान्याभर जाड उंची रुजाम्याची बैठक आंथरलेली होती. भिंतीना लागून मांडलेल्या कोचांवर बेरंगी साटणीच्या गिरद्या टाकलेल्या होत्या, वरच्या छतावर जागोजाग गुलाबी कमळांच्या आणि हिरव्या गार पसरट गोल पानांच्या आकृत्या रंगविलेल्या होत्या व त्या आकृतीतल्या जाड सोनेरी रेषा चमकत होत्या. छताला एकंदर तीन झुंबरं टांगलेली होती, त्यातलं मधलं खूपच मोठं होतं. दोन्ही बाजूंच्या भिंतीवर खूप मोठ्या आकाराची चित्रं रंगविलेली होती. एका चित्रात बोधिवृक्षाखाली बुद्ध बसले होते, दुसऱ्यात गुरू नानक होते, तिसऱ्यात रणांगणावर रथात सारथ्याच्या जागी बसलेले श्रीकृष्ण अर्जुनाला गीता सांगत होते, चवथ्यात कुमारी मेरी आपल्या पोटी आलेल्या अवतारी बालकाकडे बघत होती. भिंतीवर ज्या जागी चित्रे नव्हती त्या जागी खूप मोठ्या आकराचे बिलोरी आरसे बसविलेले होते, आणि हॉलमध्ये  शे पाऊणशे माणसांची प्रतिबिंबं दोन्हीकडच्या आरशात पडल्यामुळे हजारो लोक जमल्याचा भास होत होता... ज्यांना आज प्रथमच या हॉलमध्ये पाऊल टाकण्याची संधी मिळाली होती ते त्या ठिकाणचा हा सारा शृंगार बघून घेत होते, बहादरसिंगांच्या कारखान्यातल्या माणसांनी वर्णन केलं तसं हे घर आहे खरं...

कारखान्यातले कामगारच तेवढे नव्हे तर मिक्टिला शहरातली जी जी माणसं बहादरसिंगांना ओळखीत होती ती त्यांच्या श्रीमंतीबद्दल बोलताना म्हणत, ''सरदारजींची भाग्यरेषाच चांगली!'' पंचवीस वर्षांपूर्वी त्यांनी धंदा सुरू केला तो फक्त एका ट्रकवर. आणि तोही ट्रक हप्त्याहप्त्यानी खरीदण्याच्या बोलीवर घेतलेला. पण आज घटकेला त्यांच्या धंद्याचा पसारा केवढा वाढला होता. मालाची वाहतूक



करणारे डझनभर ट्रक तर त्यांच्या मालकीचे होतेच, पण उतारूंची ने-आण करणाऱ्या त्यांच्या मालकीच्या पंधरा बसगाड्या मिक्टिलापासून वर उत्तरेकडे कलेवापर्यंत आणि खाली नैऋत्येकडे अक्याबपर्यंत धावत होत्या. त्यांनी आपल्या कंपनीची एक शाखा रंगूनलादेखील भागीदारीत काढली होती. जपान्यांनी रंगूनवर बाँबफेक केली तेव्हा दुर्दैवानं बहादरसिंगांच्या या शाखेचा कारखाना आणि तबेला बेचिराख झाला होता, आणि मोगल स्ट्रीटवर राहणारे त्यांचे भागीदार व त्या भागीदारांची पत्नीदेखील मृत्युमुखी पडली होती. तथापि रंगूनची शाखा हातची गेली तरी मिक्टिलातला कारखाना आणि तिथला धंदा शाबूत राहिला होता. बहादरसिंगांच्या बरकतीला काही विशेष धक्का पोचला नव्हता. त्यांची श्रीमंती होती तशीच राहिली होती. आणि त्याहूनही मिक्टिलातल्या लोकांना जास्त कौतुक वाटत होतं ते या गोष्टीचं की बहादरसिंगांच्या उदार आनंदी हौशी स्वभावात अंतर पडलं नव्हतं. मिक्टिला गावाचं पुढारीपण ते उत्साहानं करीत होते. नेताजींच्या चळवळीला त्यांनी केवढी मोठी मदत केली ते साऱ्यांना माहीत होतं. चार लोकांनी आपल्याकडे यावं, त्यांचं आगतस्वागत आपल्याकडून व्हावं अशी त्यांच्या मनाची हौस असे... आजच पहा ना, सकाळपासून सबंध दिवसभर आणि आता रात्रीदेखील त्यांच्या दिवाणखान्यात माणसांची गर्दी जमलेली होती, आणि त्या गर्दीतल्या अपरिचित आणि सामान्य माणसांनादेखील कुणी हटकत तर नव्हतंच; परंतु दर घटका दोन घटकांनी कॉफी दिली जाई तेव्हा त्या पाहुणचारातदेखील त्यांचा अंतर्भाव आवर्जून करण्यात येई...

रेडिओवर चाललेलं नाटक ऐकता ऐकता दिवाणखान्याची शोभा ज्याप्रमाणे अनोळखी माणसं बघून घेत होती त्याप्रमाणेच बहादरसिंगांच्या घरातील जी माणसं अधून मधून दिवाणखान्यात येत-जात त्यांच्याबद्दल त्यांना साहजिकच कुतूहल वाटे. आणि उजव्या-डाव्या बाजूस कुणी माहीतगार माणूस सापडला तर त्याच्या कानाशी कुजबुजून विचारल्यावाचून त्यांना राहवत नसे. रेडिओपुढच्या खुर्चीवर बहादरसिंगांचा पृथिवी नावाचा पंधरा वर्षांचा मुलगा बसला होता. बहादरसिंगांची पत्नी मध्येच येऊन कोचावर बसत होती, उठून आत जात होती. स्वत: बहादरसिंग राममंदिरात होणाऱ्या उत्सवाची तयारी करण्यात गुंतल्यामुळे दिवसभर गैरहजर होते; पण आता स्वस्थपणानं कोचावर बसले होते. त्यांच्या उजव्या बाजूला शेजारच्याच छोट्या बंगल्यात राहणारे अर्जन सहाय नावाचे वृद्ध गृहस्थ आपल्या अधू डोळ्यांना काळा